ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २०८ वा ❑ भारतीय सौर दिनांक १६ आश्विन शके १९४८, गुरूवार दि.०८ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

दुष्काळात होरपळलेला शेतकरी: पंचनाम्यांच्या कात्रीत अडकला बळीराजा!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

दुष्काळात होरपळलेला शेतकरी आज खरोखरच शासकीय पंचनाम्यांच्या कात्रीत अडकला आहे. एकीकडे अस्मानी संकटामुळे हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेला असताना, दुसरीकडे सुलतानी कारभार आणि जाचक नियमांमुळे बळीराजाला हक्काची मदत मिळणे कठीण झाले आहे.

महाराष्ट्रात २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ (ट्रिगर-१) जाहीर करण्यात आला असून सध्या पिकांचे पंचनामे करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. मात्र, या दुष्काळाच्या पंचनाम्यांच्या विविध अटी आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे शेतकरी प्रचंड हैरान झाले आहेत.दुष्काळाचा पंचनामा करताना अधिकारी आणि प्रशासनाच्या लालफितीच्या कारभारामुळे शेतकरी सर्वात जास्त हैरान झाले आहेत. पिकांचे अतोनात नुकसान होऊनही सरकारी मदत मिळण्यात होणारा उशीर आणि नियमांचा गुंता यामुळे शेतकरी त्रस्त आहेत.

सरकारने दुष्काळ आणि पंचनाम्यांची घोषणा केली असली, तरी अनेक भागांत (उदा. धारणी, मेळघाट व इतर दुर्गम भाग) पंचनामा करण्यासाठी नेमलेले पटवारी, कृषी सहाय्यक आणि ग्रामसेवकांना अद्याप प्रशासनाकडून कोणतेही लेखी आदेश मिळालेले नाहीत. यामुळे प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्याने शेतकरी केवळ प्रतीक्षेत अडकून पडला आहे.

दुष्काळ जाहीर करणे आणि त्याच्या पंचनाम्याचे (नुकसान भरपाईचे) निकष अत्यंत कठीण आणि जाचक आहेत, ही शेतकरी आणि ग्रामीण भागातील एक मोठी वस्तुस्थिती आहे. अनेकदा प्रत्यक्षात पीक जळून गेलेले असतानाही, सरकारी कागदपत्रांमध्ये आणि निकषांच्या चौकटीत ते बसत नसल्यामुळे शेतकरी मदतीपासून वंचित राहतात.

पीक नुकसानीची माहिती अपलोड करण्यासाठी सरकारने ऑनलाईन ॲप (उदा.) अनिवार्य केले आहे. मात्र, ग्रामीण भागात नेटवर्क नसणे किंवा सर्व्हर डाऊन असणे यामुळे शेतकऱ्यांना वेळेत माहिती भरता येत नाही. निसर्गाच्या आपत्तीनंतर ७२ तासांच्या आत ऑनलाईन तक्रार करणे बंधनकारक आहे. पण सर्व्हर चालत नसल्यामुळे हा वेळ निघून जातो आणि शेतकरी मदतीपासून वंचित राहतात.

दुष्काळ किंवा अतिवृष्टी झाल्यानंतर महसूल विभाग, कृषी विभाग आणि विमा कंपनीचे प्रतिनिधी शेतावर वेळेत पोहोचत नाहीत.

अधिकारी येईपर्यंत शेतातील खराब झालेले पीक तसेच ठेवावे लागते. यामुळे पुढील पिकाची पेरणी खोळंबते आणि शेतकरी दुहेरी संकटात सापडतो.विमा कंपन्या भरपाई देण्याऐवजी पिकांचे नुकसान कसे ग्राह्य धरता येणार नाही, याच्या पळवाटा शोधतात.

हजारो रुपये विमा हप्ता भरूनही प्रत्यक्ष नुकसान भरपाई मिळताना केवळ काही शंभर रुपये किंवा अत्यंत कमी रक्कम बँक खात्यात जमा होते, ज्यामुळे शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा होते.

विशेष म्हणजे कृषी सहाय्यक, तलाठी आणि ग्रामसेवक यांच्यात योग्य समन्वय नसतो. नुकसानीचा आकडा निश्चित करताना होणाऱ्या मतभेदांमुळे अंतिम अहवाल तयार होण्यास अनेक महिने लागतात.

शासनाकडून हेक्टरी मिळणारी संभाव्य मदत (उदा. कोरडवाहूसाठी ₹१७,५०० प्रति हेक्टर) आणि प्रत्यक्षात झालेला खर्च यात मोठी तफावत आहे. अनेक शेतकऱ्यांनी सावकारांकडून किंवा बँकांकडून व्याजाने घेतलेले कर्ज आता कसे फेडायचे आणि पुढील रब्बी हंगामाची तयारी कशी करायची, या विवंचनेने त्यांना ग्रासले आहे.

पिके तर हातातून गेलीच आहेत, पण सोबतच जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने चारा निर्यातीवर बंदी घातली असली, तरी शेतकऱ्यांना आपल्या पशुधनाला जगवण्यासाठी खासगी टँकर्स आणि महागड्या चाऱ्यावर अवलंबून राहावे लागत आहे, ज्यामुळे त्यांचा आर्थिक भार अधिकच वाढला आहे.

थोडक्यात सांगायचे तर, एकीकडे निसर्गाने दिलेला दगा आणि दुसरीकडे पंचनाम्यांसाठी लागणारा प्रशासकीय वेळ व तांत्रिक कागदपत्रांची जुळवाजुळव (जसे की शेतकरी आयडी, आधार, बँक खाती, ८-अ उतारा जोडणे) या दुहेरी संकटात महाराष्ट्राचा बळीराजा अडकला आहे.

प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात सुरु होणार 'मराठी भाषा विकास कक्ष-डॉ. उदय सामंत

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

रत्नागिरी – महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात आता स्वतंत्र 'मराठी भाषा विकास कक्ष' सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला असून, जिल्हाधिकाऱ्यांनी यासाठी तातडीने जागा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिले. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि भाषा अधिकाऱ्यांसोबत त्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहातून दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक घेतली.

जिल्हाधिकारी मनुज जिंदल, संचालक डॉ. शामकांत देवरे, निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी, नगराध्यक्ष शिल्पा सुर्वे, प्रांताधिकारी जीवन देसाई आदी उपस्थित होते. मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. मराठी भाषा मंत्री डॉ. सामंत म्हणाले, प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात किंवा त्याच्या परिसरात



मराठी भाषा विकास कक्ष सुरू केला जाईल. यासाठी जिल्हा प्रशासनाने ५०० ते ६०० चौरस फुटांची जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या कक्षाची आस्थापना, फर्निचर याचा सर्व खर्च मराठी भाषा विभागामार्फतच केला जाईल. जिल्हा प्रशासनावर याचा कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

मराठी भाषा अधिकाऱ्यांनी इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच कार्यालयीन कामकाजाच्या वेळेचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. नियमित उपस्थिती नोंदवण्यासाठी बायोमेट्रिक हजेरी सक्तीची करण्यात आली आहे. बायोमेट्रिक अहवाल प्रमाणित करण्यासाठी जिल्हाधिकारी नियुक्त उपजिल्हाधिकारी (महसूल) हे स्वाक्षरी प्राधिकारी असतील.

जिल्हाधिकाऱ्यांना उत्तरदायी

मराठी भाषा अधिकारी जरी विभागामार्फत नियुक्त असले, तरी त्यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली व समन्वयाने काम करणे बंधनकारक राहील. जिल्ह्यातील साहित्य संमेलनांचे आयोजन, स्थानिक साहित्यिकांशी संपर्क, दुर्लक्षित व अप्रकाशित साहित्याचे पुनरावलोकन करून ते वाचनालयांपर्यंत पोहोचवणे, असे ५ ते ६ महत्त्वाचे उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात मराठी भाषा अधिकाऱ्यांमार्फत राबवले जातील. यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आली आहे.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर सुरू असलेले काम वेगाने पुढे नेले जात असून, भाषा अधिकाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्याचा विभागाचा विचार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मराठी ही आपली मातृभाषा असल्याने या उपक्रमाला सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरात लवकर जागा उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन डॉ. सामंत यांनी शेवटी केले.

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात मराठी भाषेचा वापर १००% व्हावा आणि शासन व जनता यांच्यातील संवाद मराठीतून वृद्धिंगत व्हावा या दृष्टीने महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये 'जिल्हा मराठी भाषा विकास कक्ष' स्थापन करण्यात येत आहे. प्रत्येक जिल्हा मराठी भाषा विकास कक्षाकरिता एक 'जिल्हा मराठी भाषा अधिकारी' आणि या कक्षाच्या कामांमध्ये त्याला साहाय्य करण्याकरिता दोन लिपिक-टंकलेखक व एक शिपाई अशी ४ पदे बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्याची कार्यवाही राज्य मराठी विकास संस्थेद्वारे केली जात आहे.

कधी येणार पाऊस...

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

उन्हाळा संपून पावसाळा लागला तेव्हा सर्वांच्या अपेक्षा उंचावलेल्या होत्या. प्रसार माध्यमात अशी चर्चा होती की, या वर्षी पाऊस खूप कमी आहे. कुणीतरी जांभूळ जास्त आलेत की पाऊस कमी पडतो असे सांगत होते. पर्यावरण तज्ज्ञ, विज्ञान अभ्यासक, भविष्यकार असे सर्व

आपले मत व्यक्त करत होते. पण सर्वांचे समाधान होईल असा अंदाज कुणी देऊ शकले नाही. ''निसर्ग कुणाच्या हातात नाही'' असेच म्हणावे लागेल. ''आला आला वारा, संगे पावसाच्या धारा '' पण यावर्षी दुर्देवाने वाऱ्यासंगे पावसाच्या धारा नव्हत्या. आज येईल उद्या येईल असे म्हणता म्हणता पूर्ण पावसाळा संपत आला. आता परतीच्या पावसाचे दिवस. जो पाहुणा



आलाच नाही त्याला निरोप तरी कसा द्यायचा,हा ही एक प्रश्नच आहे. शासन किंवा इतर कुणी काय करतील त्यापेक्षा ''आपण काय करायचे'' हा एक चिंतनाचा विषय आहे. पाण्याचा वापर काटकसरीने करावा लागेल. गळणारे नळ लगेच दुरुस्त करावे किंवा बदलावे कारण त्यातून हजारो लिटर पाणी वाया जाते. थेंब थेंब पाणी वाचवण्यासाठी हे करणे आवश्यक आहे.पाण्याचा पुनर्वापर करतांना रसायने न वापरलेले पाणी झाडांना द्यावे.



अनावश्यक पाणी सांडणे टाळावे. पाणी कधीच शिळे होत नाही. म्हणून कालचे पाणी आज फेकून देणे योग्य होणार नाही. ''पाणी वाचवा, जीवन वाचवा'' ही केवळ घोषणा राहू नये. जिथे पाण्याच्या टाक्या सामायिक आहेत तिथे वादाचे मुद्दे टाळून समन्वय साधण्याचा प्रयत्न करावा. नवीन झाडे लावणे शक्य नसेल तरी आहे ती झाडे वाचवण्याचा प्रयत्न करावा. पर्यावरणाचे महत्वाचे घटक असल्याने पशुपक्ष्यांना पाणी द्यावे. ''टप टप टप काय बाहेर वाजते ते पाहू'' हे गीत आपल्या चिमुकल्याला म्हणत असता आईच्याच डोळ्यातून पाणी गळत आहे. दुष्काळाच्या झळा केवळ शेतकऱ्यांनाच नसतात. त्यात आपण सर्वजण सहभागी आहोत. याची जाण ठेवून वागणे या काळात अपेक्षित आहे. अजूनही ''ये रे ये रे पावसा'' अशी प्रार्थना आपण करावी म्हणजे पुढील पावसाळ्यापर्यंतचे जगणे सुसह्य होईल असे वाटते.

कवितेमुळे पुनर्जन्म लाभला म्हणूनच मी कवितेला आईच संबोधतो-कवी प्रा.वा. ना.आंधळे

शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनच्या चौथे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलनातील कवी संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

त्र्यंबकेश्वर – माझ्या आईच्या पोटी मी जन्मलो अन जगाचे दर्शन झाले.ऐन तारुण्यात माझा कवितेच्या पोटी जन्म झाला अन जग मला ओळखू लागले.आईने बोट धरून चालणं शिकवलं तर कवितेने बोट धरून बोलणं शिकवलं.आई आशीर्वाद देतांना म्हणायची औक्षवंत हो! कविता आशीर्वाद देतांना म्हणायची मी तुला चिरंजीव करीन.मित्रहो,कवितेनं भरभरून ओळख दिली.शालेय अभ्यासक्रमापासून पदव्युत्तर अभ्यासक्रमात कवितेनेच मला मिरविले.आपल्या सारख्या श्रोत्यांपासून सातासमुद्रापार असलेल्या वाचकांपर्यंत पोहचवले.मातृप्रेम यापेक्षा आणखी काय वेगळे असते.म्हणून मी तिला आईच संबोधतो.

शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन, मुक्ताईनगर जिल्हा जळगाव आयोजित दि. ३ व ४ऑक्टोबर२०२६ या दोन दिवशीय चौथ्या अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलनात त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज साहित्य नगरी व आदिशक्ती संत मुक्ताई व्यासपीठ संत निवृत्तीनाथ महाराज समाधी मंदिर शेजारी भव्य सभागृहात ते कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते.संभाजीनगर येथील उज्जैनकर फाउंडेशनचे राज्य अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. सुभाष बागल यांचे



अध्यक्षतेखाली संमेलन नुकतेच भव्य आणि दिव्य स्वरूपात संपन्न झाले. या

या संमेलनातील भव्य ग्रंथ दिंडी सर्वांचेच आकर्षण ठरले यामध्ये संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांना आदिशक्ती संत मुक्ताई कडून भव्य आणि दिव्य हार सर्वांच्या उपस्थितीत अर्पण करण्यात आला हे या संमेलनाचे विशेष आकर्षण ठरले.

एरंडोल जिल्हा जळगाव येथील सुप्रसिद्ध कवी प्रा.वा.ना.आंधळे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन सुद्धा भन्नाट गाजले या प्रसंगी व्यासपीठावर फाऊंडेशनचे कोल्हापूर येथील डॉ.मारुती गुरव अकोला येथील ज्येष्ठ साहित्यिक श्री तुळशीराम बोबडे श्री वासुदेव खोपडे अमरावती येथील प्रा. डॉ.मंदा नांदुरकर श्री संजय ठोसर फाऊंडेशनचे बार्शी जिल्हा सोलापूर येथील कवी अशोक मोहिते, प्राचार्य डॉ.पंढरीनाथ शेळके, आळंदी येथील सौ.रूपाली चिंचोलकर सांगली येथील सौ.मेघा पाटील बेळगाव कर्नाटक येथील प्रा.विनायक पाटील पुण्यातील श्री जगन्नाथ बुडूखले गुरुजी खामगाव येथील श्री पांडुरंग दैवज्ञ श्री शंकरराव अनासुने श्री बाळु भाऊ इटणारे साखरखेर्डा येथील कवी रामदास कोरडे

आदी मान्यवर प्रमुख म्हणून उपस्थिती व्यासपीठावर उपस्थित होते याप्रसंगी नाशिक येथील डॉ. रमाकांत जाधव डॉ. श्यामकुमार दुसाने जळगाव येथील श्री मधुकर पोतदार भुसावळ येथील ज्ञानेश्वर घुले,नांद्रा येथील कवी स्वप्नील पाटील, एरंडोल येथील श्री निंबा बडगुजर धाराशिव येथील डॉ. मधुकर हुजरे शिरपूर येथील श्री अरविंद भामरे धुळे येथील प्रा.अश्विन अमृतकर, धुळे येथील श्रीमती रंजना पवार बदलापूर येथील श्री रमेश उज्जैनकर बुलढाणा येथील श्री डी.आर. बांगर कोल्हापूर येथील श्री प्रवीण सूर्यवंशी प्रा.डॉ.सविता व्हटकर, प्रा. आरती लाटणे, श्री साताप्पा सुतार लातूर येथील श्री गुरु हराळे बेळगाव कर्नाटक येथील श्री शांताराम भादवणकर पुणे येथील श्री जगन्नाथ बुडूखले सौ.धनश्री म्हेत्रस, आदी कवी व कवयित्रींनी या कवी संमेलनात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला उज्जैनकर फाउंडेशनचे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील तसेच गोवा, कर्नाटक, गुजरात राज्यातील कवींनी आपल्या कविता सादर करून उपस्थितांच्या टाळ्या मिळवल्या. या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन फाउंडेशनच्या धुळे जिल्हा उपाध्यक्षा सौ.प्रीती नंदलाल मोरे व फाउंडेशनच्या नाशिक जिल्हा उपाध्यक्षा सौ. सारिका जोशी यांनी केले त्याप्रसंगी शेवटी या कवी संमेलनाचे अध्यक्ष प्रा.वा.ना.आंधळे यांनी सुद्धा आपली कविता सादर करून उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली. प्रा.आंधळे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की,कविता जन्माला आली अन जगण्याला मोल आले.दृष्टी आणि सृष्टी सुंदर झाली. कविता ही भेदाच्या पलीकडे नांदत असल्यामुळे व वयाच्याही मर्यादा तिला आड येत नसल्यामुळे जगाचे मातृपद कवितेकडे जाते.या विधानाची सार्थकता माऊलीच्या पायासदनाचे उदाहरण देत त्यांनी श्रोत्यांपुढे कवितेची थोरवी कथन केली.याबरोबरच संमेलनाच्या एकूणच आयोजन नियोजनावर भाष्य करतांना ते म्हणाले ,हे चौथे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन गेल्या दोन दिवसापासून विविध उपक्रमांनी व विविध जिल्ह्यातून,राज्यातून आलेल्या साहित्यिक, रसिकांची दाद मिळवून गेले. या संमेलनाच्या यशाचे श्रेय उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा या संमेलनाचे मुख्य आयोजक डॉ. शिवचरण उज्जैनकर यांना व त्यांच्या सर्व कुटुंबीयांना तसेच नातेवाईकांना आणि फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांना जाते.या भावशब्दात एकूणच साहित्य संमेलनाविषयी कृतज्ञता कवी संमेलनाध्यक्ष प्रा.वा. ना.आंधळे यांनी उपस्थितांसमोर नोंदवली.



जात्यावरच्या ओव्या.....

आली आली गौराई
राहीली दोन दिस
मन,डोळेही भरले
खाऊन दोन घास ||८७९||

आली आली गौराई
लगबग घरीदारी
हात जोडून उभे
हिच्या पुढे कारभारी ||८८०||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७७



ज्योतिर्मय साहित्य

ही चिंता का टाकून द्यायची ? कारण जी गोष्ट मुळात नाहीच आहे, तिच्याबद्दल चिंता करून काय उपयोग ? मोहमायेमुळे हा संसार आपल्याला खरा वाटतो. त्याची भूल आपल्याला पडते. पण खऱ्या सत्यापासून आपण लांब जातो. वाळवंटातील तहानलेल्या माणसाला मृगजळ दृष्टीस पडते. तिथे आपल्याला नक्कीच पाणी मिळेल या आशेने तो त्याच्या शोधात पुढे पुढे जात राहतो. शेवटी त्याला लक्षात येते की आपल्याला जे पाणी वाटले होते, ते तर केवळ मृगजळ ! मृगजळ म्हणजे भ्रम. पाणी नाही हे सत्य. त्याप्रमाणेच हा संसार ! खरा वाटतो पण अखेरीस त्याची व्यर्थता लक्षात येते. खरी वस्तू एकच. ती म्हणजे भगवंताचे नाम. ते नाम पवित्र करणारे आहे. सत्याची जाणीव करून देणारे आहे. संसाराची व्यर्थता लक्षात आणून देणारे आहे. म्हणून हे मना, असे पवित्र नाम तू हृदयात धारण कर आणि संसाराची व्यर्थ चिंता सोडून दे. जी गोष्ट मुळात नाहीच तिची चिंता करण्यात काय अर्थ ?



तुकाराम महाराज म्हणतात,''हेचि थोर भक्ती आवडते देवा, संकल्पावी माया संसाराची.'' भक्ती करणे म्हणजे जी गोष्ट आपल्याला अत्यंत प्रिय असते, ती परमेश्वराला अर्पण करावी. संसार, मुलेबाळे या गोष्टी आपल्या अत्यंत प्रिय असतात. त्यांच्यावर आपले जीवापाड प्रेम असते. हेच प्रेम भगवंताला अर्पण करावे. आणि भगवंताचे प्रेम अंतर्यामी धारण करावे.

स्वसंवाद :


१. ज्या शिक्षण, नोकरी, संपत्ती किंवा नात्यांना मी माझ्या जीवनाचे सार्थक मानून बसलो आहे, ते खरंच चिरंतन सत्य आहे की केवळ एक तात्पुरता भ्रम (मृगजळ) आहे?


२. ''म्हातारपणी माझे कसे होईल? मुले मला सांभाळतील ना?'' अशा भविष्यातील भवाच्या (संसाराच्या) व्यर्थ चिंतांमध्ये मी माझा आजचा दिवस आणि मनाची शांतता गमावत आहे का?

३. माझ्या अंतर्मनात साचलेला बऱ्या-वाईट वासनांचा कचरा साफ करण्यासाठी मी पतितांना पावन करणाऱ्या राघवाच्या नामाचा आश्रय किती वेळा घेतो?

४. तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे, मी प्रपंचातील माझी सर्व आसक्ती आणि प्रेम भगवंताच्या चरणी अर्पण करून निर्वासन भक्तीचा अनुभव घ्यायला तयार आहे का? **(क्रमशः)**







नामाचे सूक्ष्म स्वरूप

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वत:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दु:खाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदु: खाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.


***







॥ श्री दत्त महिमा ॥



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड

सोळा दत्त अवतार

ज्योतिर्मय साहित्य

दत्त संप्रदायातील मनुष्य रूपातील दत्तावतारी पुरुष यांची अर्थात श्रीपाद श्रीवल्लभ, श्री नरसिंह सरस्वती यांची माहिती सह दत्तभक्त सत्पुरुष सर्वज्ञ दासोपंत, संत एकनाथ महाराज,प.पु.वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांचीही माहिती आपण मागील लेखात घेतली आहे.

मूळ अत्री अनुसया पुत्र असलेले दत्त महाराज यांचा जन्म मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशी सायं संध्येच्या वेळी आपण साजरा करतो. मात्र दत्त महाराजांनी जे १६ अवतार घेतले त्यांची फारशी माहिती दत्त भक्तांना नसते त्यामुळे अनेक भक्त मार्गशीर्ष पौर्णिमा या दिवशीही दत्तप्रभूंचा जन्मोत्सव साजरा करतात ते योग्यही आहे.

कारण दत्त महाराजांचे सोळा अवतार आहेत प्रत्येक अवतारांचा जन्मोत्सव तितकाच महत्त्वाचा आहे ते सोळा अवतार कोणते हे आपण पाहू या.

नित्य पाठातील उल्लेखाप्रमाणे जे सोळा अवतार आहेत ते

''अत्रीवरदा, योगीराजा, दत्तात्रेया हेमगर्भा'' महाराजा ''कालाग्निशमना, योगीजन वल्लभा, लीला विश्वंभरा'' खेळसी



''ज्ञानसागरा, सिद्धराजा, अवधूता,'' येई काजा ''मायामुक्तअवधुता'' रक्षी लाजा ''मायादत्त,'' स्वामीया ''आदीगुरु, शिव शिवा'' हो येई ''देवा देवा'',हो ''दिगंबरा, कृष्णशामा कमलनयना'' येई रे .

''ऐसे स्मरण करता दत्ताचे प्रकट झाले रूप तयांचे षडभूज योगियांचे रूप प्रत्यक्ष देखती ....''

या सर्व अवताराचे जन्म वेगवेगळ्या तिथी आणि महिन्यात झाले आहेत.

चैत्र ते फाल्गुन या बारा महिन्या प्रमाणे कार्तिक मासी ४ मार्गशिर्ष मासी २ व अन्य १० मासात प्रत्येकी १ असे सोळा श्रीदत्त अवतार जन्म वर्णीलेले आहेत.

चैत्र शु. पौर्णिमा – ''अवधुत''
वैशाख शु. चतुर्दशी ''मायामुक्त अवधुत''
जेष्ठ शु. त्रयोदशी – मायादत्त
आषाढ शु. पौर्णिमा – आदिगुरु
श्रावण शु. अष्टमी – शिवशिवाय
भाद्रपद शु.चतुर्दशी – देवदेव
अश्विन शु.पौर्णिमा – दिगंबर
कार्तिक शु.द्वादशी – कमलनयना कृष्णशामा
कार्तिक शु.पौर्णिमा – योगीराज
कार्तिक वद्य प्रतिपदा – अत्रीवरद
कार्तिक वद्य द्वितीया – हेमगर्भ दत्तात्रेय
मार्गशिर्ष शु.चतुर्दशी – कालाग्री शमन
मार्गशिर्ष शु.पौर्णिमा – योगीजन वल्लभ
पौष शु.पौर्णिमा – लीला विश्वंभर
माघ शु. पौर्णिमा – सिद्धराज
फाल्गुन शु.नवमी – ज्ञानसागर

असे सोळा अवतार आहेत.

दत्त भक्त मंडळी च्या माहिती साठी ही सेवा दत्त चरणी अर्पण.

गुरुदेव दत्त कृपा करा.



अस्तित्व.....

ज्योतिर्मय साहित्य

.....अगदी पहाटेच झाली इथे तिघांची सलगी.... मखमली सोनचाफा, मारवा अन् बकुळी....

निघून गेली यामिनी.... अन् रश्मी मिठीत आली....

ही भेट मिलनाची, अन् उधळणं सुगंधाची....

अवघ्या परसबागेत दरवळतोय यांचाच मंद गंध... मन अधीर होतंय अन अलगद रेशमी पाकळीजवळ पावले वळतात.... एकदा ओंजळीत सोनचाफा आलाय की अवघं गात्र सुगंधित.....

पाकळी उमलतांना प्रस्त्रवला सोनचाफा.....

जणू... सैरंध्रीच्या प्रीतीसाठी दरवळतो सोनचाफा..

मनाचा गाभाऱ्यातलं आतलं सौख्य तेव्हाच उमजतं....

आणि एक शांततेचा उसासा दीर्घकाळ टिकतो....

अलगद काही ओळी ओठांवर येतात....

मी आज आले, वस्तीत सुगंधाच्या..

मन न्हावून गेले, प्रेमात केशराच्या....

सोहळा सुगंधाचा नव्याने बहरला आज.....

मी अनुभवते जणू ऋतूंचा मधुमास... सोनचाफा.... श्रीहरीच्या चरणी तू अधिकच सुरेख दिसतोय.... श्रीलक्ष्मीच्या समीप अर्थातच विष्णुप्रियाला तू फारच प्रिय..... झाडावरचं तुझं बहरणं, गंधाळणं अन माझं तुझ्याच सौंदर्यात, गंधात एकरूप होणं... तुला वेणीत माळायचं आणि मन लावून जपायचं.... इतकंच नको रे...!

आयुर्वेदात लाभदायी तुझ्या पाकळीचा रंग ...

आरोग्यदायी तुझी पाने, सोबतीला



तुझा सुगंध.....

बहरल्या तुझ्या अस्तित्वाची कुणी ना जागा घ्यावी. तुझ्या समर्पणाने मेदिनी तृप्त व्हावी...

देव्हाऱ्यात तुझं गौरीच्या चरणी समर्पित होणं... सोबतच हलक्या केशरी रंगातून पाकळीचं निरागस सौंदर्य टिकवणं....

...देवळाच्या गाभाऱ्यातून निर्माण होणाऱ्या आध्यात्मिक पावित्र्यतेचा सुरेख मिलाप....

म्हणजेच सोनचाफा.....

बकुळी..... जणू धरेतली शुभ्र तारका.....

तुझ्या अस्तित्वाचा अवघ्या सृष्टीला अभिमान... साधेपण... अंतर्मनातील निखळता..... आतली सौम्यता.... अनुरागाचं प्रतीक बनून संयमाने कर्तृत्व देखणं करणं.....

... हे कधी मिरवावं लागत नाही... ते आपल्या गुणधर्माने कळतंय....


आध्यात्मिक जीवनाचा पाया नम्रता हाच आहे हे तुझ्या अस्तित्वातून उमजतंय.....

आता सरून गेले.... ते स्वप्न तारुण्याचे....

तुझ्या गंधात होते भिजले, धागे गजऱ्याचे....

बकुळी.... पहाटेचा मंद गारवा तुला जसा स्पर्शतो.... तसा हलकासा स्वर निनादतो.... तुझ्या अन् धरेच्या भेटण्याचा....

या भेटीच्या माध्यमातून आयुष्य जगणं सहज समजतं.....



मेघात विरून जातो मृगांक तुझ्यासाठी....

चांदणं धरेत येतं.. तुझ्या अस्तित्वासाठी....

म्हणतात ना....! ''आयुष्य जगावं बकुळीसारखं... स्वतःचं साधेपण विशेष गुणधर्मातून दर्शवावं.... तुला पारखावं..... तुझ्यातलं अनमोल सौंदर्य अवघ्या सृष्टीला कळावं..... अगदी संयमतेत स्वअस्तित्वात तुझं दरवळणं मनाला दिलासा देतंय ...

बकुळीची माळ... सुगंधाचे पाणी.... सांडले धरेत....ऐका तिची कहाणी.....

''पानापानातून सळसळतोय.... हिरव्या रंगाचा साज...''

''नाही कुणास कळला बकुळीच्या गंधाचा राज..''....

असाच निवांत उसासा घेऊन बकुळ निरंतर दरवळतेय....

मारवा.....(रान तुळस)

तुझा परिमळ....तुझ्यातल्या जांभळ्या मंजिरीचे सौंदर्य अवघ्या धरित्रीचा अलंकार... तुझ्यातला रसरसलेला आयुर्वेद गुणधर्म.... तुझं धरेला अलगद अर्पण होणं....तुझ्या पानांच्या सुवासाने सारे व्यंजन रुचकर आणि लाभदायी ... तुझी देठे आणि मुळे आरोग्यास गुणकारी..... सुकली जरी मंजिरी तरीही आयुर्वेद सांगतो मारवा अत्यंत बहुगुणी .....

आज या तिघांचं स्वतंत्र अस्तित्व लिहितांना जणू रेषांवर -शब्दांवर सुगंधाचे दवं ओघळत आहे असा काहीसा भास होतोय....

शेवटी एकच सांगावंसं वाटतंय....

हे सृष्टीतील सुगंध अव्यय आहेत....

''गंध देऊन गेले.....''

''निर्माल्य सुकलेले''...

''आता जपायचे हे ''...

''आयुष्य राहिलेले''....

***

आपल्या बलस्थानावर भर हे आनंद लक्षण

ज्योतिर्मय साहित्य



कोठल्याही लहान सहान गोष्टीला महत्व देवून नैराश्यात जावून आयुष्याच्या प्रगति मध्ये गतिरोध निर्माण करून घेवून वाटचाल सुरळीत होवू न शकन्याचीच शक्यता जास्त आहे. अशा वेळी आपले बलस्थान शोधून धाडसाने पुढे जाण्याचे सातत्य वृद्धा बरोबर तरुण तरुणी नी ही हे जाणिव पूर्वक लक्षात घेतले पाहिजे.

आपल्या बल स्थानाची बाजू कच्ची नसली पाहिजे. कारण जे डोळ्याला दिसते तेच खरे असते असे मुळीच नसते तर ते त्यापासून वेगळेच रसायन असत. पण आयुष्याचे सूर जुळवावयाचे असल्यास कोठेतरी, कोणावर तरी विसंबून रहावे लागते. सकारात्मक दृष्टीकोन ठेवावाच लागतो. कोणीतरी गुरु संदेश देणारा असावा लागतो. तेव्हाच जीवन बाग समाधानाने फ ुलण्याचा आनंद क्षण प्राप्त होतो. म्हणून प्रेरणा स्थानावर कोणाला तरी विराजमान करावे लागते. आणि आपले बल स्थान दृढ करावे लागते. एकलव्याचे उदाहरण स्मरणात ठेवावेच लागते. प्रसंगी मैत्रीच्या विळख्यात घेवून जपावे लागते. पण त्या साठी निर्माण झालेले क्षण अलगद टिपता आले पाहिजे. आपल्या बल स्थानावर दृढ विश्वास ठेवून वर्तमानात प्रवास करणे सुख कारक होते. दुःखाला, नैराश्याला किंवा अपयशाला कवटाळून बसणे आत्मघातकी ठरणारे असते. आश्वासक मार्ग दर्शनाची काठी निर्माण करून आपल्या मनावरील ताण तणाव दूर करण्याचे कसब आत्मसात करून त्याला हास्य विनोदाची झालर दिली तर ती व्यक्ती आपल्या आयुष्यात कधीच बॅकफूटवर जाणार नाही.



आपल्या बल स्थानाचा खोलात जावून अभ्यास करण्याची मात्र गरज असते. शिवाय बल स्थानाची निष्क्रियता समजून घेवून अनुभवाच्या जोरावर त्यात सकारात्मकता आणण्याचे प्रयत्न करणे, संघर्ष करून यश मिळविणे. गरजेचे असते. अर्थात साप साप म्हणून भुई बडविण्यात काही अर्थ नसतो. आपल्या बलस्थाना बद्दल संशय किंवा गैरसमज अविश्वास, नसावा लागतो.

जीवनाच्या वाळवंटा मध्ये भरकटून जायचे नसेल तर, आपल्या बलस्थानाचा उपयोग आत्मविश्वासाने करणे आवश्यक बाब आहे. व्यवहारिक दृष्ट्या सभ्य व्यक्ती ही त्याच्या नैतिक उंचीवरून नेहमीच मोजली जाते, तेव्हां त्याच्या सभ्य संस्काराची बेरीज केली जाते, बल स्थानाला प्राधान्याने विचारात घेतले जाते. म्हणूनच आपल्या बल स्थानाला विशेष महत्व आहे.


अभिजात मराठी दर्जा सप्ताह निमित्त वैजापूरात प्रश्न मंजुषा, वक्तृत्व स्पर्धा, वाचन स्पर्धा व विद्यार्थी पालक- संवाद स्पर्धा

ज्योतिर्मय साहित्य




वैजापूर (गोकुळसिंग राजपूत)- मराठी मायबोली भाषेला मिळालेल्या अभिजात दर्जा निमित्त मराठी भाषेची विद्यार्थ्यांत गोडी वाढावी, मराठी भाषेची आवड निर्माण व्हावी व मराठी भाषा सर्वदूर पोहचावी म्हणून येथील पालिकेच्या पीएमश्री मौलाना आझाद विद्यालयात या सप्ताह निमित्त बुधवार (ता,०७) रोजी विद्यार्थ्यांचे पांच गट करून त्यांना कवीचे नाव दिले, त्याना विविध प्रश्न विचारण्यात येऊन क्रमांक काढण्यात आले. सदरील स्पर्धा आयोजक शिक्षिका वैशाली पगारे (शेलार) यांनी सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत व मुख्याध्यापक बी.बी.जाधव यांच्या उपस्थितीत घेतल्या व क्रमांक काढले.या प्रसंगी परीक्षक म्हणून पूनम राजपूत, राजश्री बंड, सुवर्णा बोर्डे. ज्योती दिवेकर यांनी भूमीका पार पाडली. क्रीडा शिक्षक बोढरे,सुभाष गोमलाडू, संदीप शेळके यांनी सहभाग नोंदवीला. शेवटी बी.बी.जाधव व वैशाली पगारे यांनी आभार मानून समारोप केला.











संत सेवालाल महाराज माध्यमिक विद्यालय देव्हारी शाळेत वनविभागाच्या वतीने जनजागृती कार्यक्रम



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर (गोकुळसिंग राजपूत)- सोयगाव तालुक्यातील देव्हारी वन्यजीव सप्ताहानिमित्त वनपरिक्षेत्र कार्यालय अजिंठा (प्रादेशिक) यांच्या वतीने बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी मौजे देव्हारी येथील संत सेवालाल महाराज माध्यमिक विद्यालयात वन्यजीव संवर्धन व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वन्यप्राण्यांचे महत्त्व, त्यांचे संरक्षण तसेच मानव व वन्यप्राणी यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सिल्लोड प्रादेशिक विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक भामरे साहेब यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत अस्वल, बिबट्या, साप यांसह विविध वन्यप्राण्यांविषयी माहिती दिली. वन्यप्राणी हे पर्यावरणीय साखळीतील महत्त्वाचा घटक असून, त्यांच्या अधिवासाचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

विशेषतः ग्रामीण भागात बिबट्या, अस्वल किंवा साप आढळल्यास घाबरून न जाता वनविभागाशी संपर्क साधावा, वन्यप्राण्यांना चिथावणी देऊ नये तसेच त्यांच्यापासून सुरक्षित अंतर राखावे, असे आवाहन अजिंठा वनपरिक्षेत्राचे अधिकारी संतोष दोडके याच्या कडून यावेळी करण्यात आले. मानव-वन्यप्राणी संघर्षाच्या घटना टाळण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहण्यासोबतच वन्यजीवांबाबत योग्य माहिती करून घेणे आवश्यक असल्याचेही मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना वन्यजीव संरक्षण कायदे, वन्यप्राण्यांचे अधिवास, जैवविविधतेचे महत्त्व आणि वन्यजीवांचे पर्यावरणातील योगदान याबाबत माहिती देण्यात आली. वन्यप्राण्यांबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करून त्यांच्याविषयी संवेदनशीलता निर्माण करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमास वनपरिक्षेत्र अधिकारी अजिंठा प्रा. संतोष दोडके, शिवाजी विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य जीवन कोलते पाटील,देव्हारी विद्यालयाचे मुख्याध्यापक जे. एन. सोन्ने, सहशिक्षक जाधव, राठोड, टी. एम. राठोड, सेवक विकास सुरडकर यांची उपस्थिती होती.

तसेच वनविभागाचे वनपाल प्रवीण गवळी, गणेश दांडगे, जीवन दांडगे, विजय देवकर, समाधान मोरे, दिनेश वाघ, अनिल इंगळे, शेळके यांच्यासह वनविभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित या जनजागृती कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना वन्यजीवांविषयी महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. तसेच वन्यजीवांचे संरक्षण आणि मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्यासाठी समाजाच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित झाले.

फेअरी क्विन मधील एक गोष्ट


ज्योतिर्मय साहित्य

एडमंड स्पेन्सर (१५५२-१५९९) यांनी फेअरी क्विन ची रचना १५९० मध्ये केली. राणी एलिझाबेथ प्रथम यांना हे महाकाव्य अर्पण केले. वॉल्टर रॅले यांनी राणी एलिझाबेथ प्रथम बरोबर स्पेन्सर यांची भेट घडवून आणली होती.

फेअरी क्विन काव्यात साहसी योद्धे(नाईटस) अनेक आव्हाने स्विकारतात. ते सत्याचे पाठीराखे व सदगुणी आहेत. या काव्यात स्पेन्सर यांची गोष्ट सांगण्याची कला वाखाणणीय आहे. पहिल्या दोन भागात पवित्रता व संयम या गुणांना महत्व दिले आहे. नैतिक शिक्षण देणे उद्देश असलेली, चारित्र्यास महत्व दिलेली कथा पहिल्या पुस्तकात तिसऱ्या भागात आहे. येथे फक्त त्यातील गोष्ट लक्षात घेणे एवढेच अभिप्रेत आहे. समकालीन धार्मिक, ऐतिहासिक संदर्भ, काव्यगुण, रचनेची वैशिष्ट्ये इ.विचार केलेला नाही.

साहसी योद्धयाची जादूटोणा करणाऱ्याने फसवणूक केल्यामुळे प्रेयसी ऊना पासून तो दूर गेलेला असून तिची जागा दुसरीने घेतली आहे. एकाकी ऊना निडरपणे त्याचा शोध घेत रानोमाळ भटकत आहे. ऊना सुंदर राजकुमारी असून, ती योद्धयाच्या प्रति निष्ठावंत आहे.

दाट जंगलातून जाताना एक सिंह (नैसर्गिक व नागरी शक्तिचे प्रतिक) तिच्यावर हल्ला करण्याचा पावित्रा घेतो. परंतू ऊनाच्या चारित्र्याच्या प्रभावामुळे



हिंस्त्रपणा विसरुन जाऊन तिचे हात चाटू लागतो. कदाचित तिचे कष्ट, त्रास त्याला जाणवले असतील. तिला पण त्याच्या बद्दल जिव्हाळा वाटतो.

तिला तिच्या मनात प्रियकर योद्ध्याने (रेड क्रॉस नाईट)अव्हेरल्याचे दु:ख असते. तरी आपले दु:ख मनात ठेऊन ऊना छोट्या घोड्यावर बसून त्याच्या शोधात निघते. सिंह सुद्धा तिच्या प्रभावामुळे तिचा सरंक्षक, साथीदार बनतो. दूर शोध करूनही तिची योद्धया बरोबर भेट होत नाही.

आणखी दूर गेल्यानंतर पायाखाली तुडवलेल्या गवतावरुन माणसांचा वावर तिच्या लक्षात येतो. पुढे पाण्याचे भांडे खांद्यावरुन नेत असलेली एक स्त्री (अबेसा) दिसते. जवळपास कुठे रहाता येईल का असे ऊना विचारते. परंतू ती स्त्री उत्तर देत नसल्याने उर्मट वाटते. वास्तविक ती मूक, बहिरी असते. तिने ऊना इतका सुंदर चेहरा कधीच पाहिलेला नसतो. सिंहाला बघताच ती घरी पळून जाते. घरी तिची आंधळी आई (कॉरसेका) असते. अबेसा व कॉरसेका अज्ञान व आंधळी भक्तिच्या प्रतिक आहेत. दोघी घाबरतात. कॉरसेका दार लावते.

याचवेळी थकलेली ऊना घरात येऊ देण्याचा आग्रह करते. दरवाजा न उघडल्याने सिंह जोर करुन तो उघडतो. ऊना आत येताच त्या दोघी सिंहाला घाबरुन जप करण्याचे विसरतात.

ऊना संवेदनशील वागून सांत्वनपर बोलून त्यांची भिती कमी



करते.कॉरसेका ऊनाला त्यांच्या घरी रात्रभर रहाण्यास सांगते. ऊना तिथे रात्रभर थांबते. तिला योद्धया पासून दुरावल्याचे दु:खामुळे अश्रू आवरत नसतात.सिंह तिच्या पायथ्याशी बसून रहातो.

सर्वजण गाढ झोपेत असताना लूटमार करुन संपत्ती आणलेला किकरपाईन लूटारु प्रतिसाद न मिळाल्याने जबरदस्तीने दार ऊघडतो.तो आत शिरताच सिंह त्याला ठार मारतो.

सकाळी ऊना व सिंह योद्धयाचा शोध घेण्यासाठी निघतात. कॉरसेकास सर्व गोष्टी सकाळी लक्षात येताच खूप दुख होते. सूड घेण्यसाठी ती ऊनाचा पाठलाग करुन ऊनाला गाठते. तिला अपशब्द बोलून अपमानित करते. वास्तविक तिचे आचरण पवित्र असून तिला अपवित्र म्हणतात. कोरसेका तिचे वाईट चिंतिते व तिला ध्येय प्राप्ती होऊ नये अशी इच्छा व्यक्त करते. तिच्या शापवाणीचा ऊनावर परिणाम होत नाही.

परत येताना कॉरसेकाला एक दुसरा साहसी योद्धा भेटतो. तो खरा साहसी योद्धा नसून आरकीमागो हा प्रमुख जादूटोणा करणारा असतो. त्याचा उद्देश ऊनाला अडचणीत आणणे हा असतो. कॉरसेका त्याला ऊनामुळे कसा त्रास झाला हे सांगून शाप देत दु:ख व्यक्त करते. ऊनाबद्दल माहिती मिळविणे हा उद्देश पूर्ण झाल्यानंतर आरकीमागो निघतो. ऊनाला गाठतो. तिच्या सोबतच्या सिंहाची भिती वाटल्याने तो जवळच्या टेकडीवर जातो.

ऊना चुकीने आरकीमागोस रेड क्रॉस चिन्ह असलेला साहसी योद्धा समजते. ती त्याच्या जवळ जाते. तिला वाटते तिच्या हातून त्याला न आवडणारे काही घडले आहे.


जनमानसाची नाडी ओळखणारे संघटक - गोविंदराव याळगी

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

दुसरे म्हणजे ते प्रभावी संघटक होते. गणेशोत्सवासाठी लोकांना एकत्र आणणे, टिळकांच्या सभेची व्यवस्था करणे, मॅझिनी क्लब स्थापन करणे आणि तरुणांना प्रशिक्षण देणे, या सर्व कामांत संघटनकौशल्य आवश्यक होते. त्यांनी वेगवेगळ्या सामाजिक स्तरांतील लोकांना राष्ट्रीय चळवळीशी जोडले.तिसरे म्हणजे त्यांच्यात प्रसंगावधान होते. सार्वजनिक भाषणावर बंदी असताना पर्यायी जागा एका रात्रीत तयार करणे किंवा ब्रिटिशांच्या नजरकैदेतून आंदोलनाचे मार्ग शोधणे, या कृतींमधून त्यांची कार्यक्षमता दिसते.

चौथे म्हणजे त्यांच्यात सांस्कृतिक साधनांचा राजकीय उपयोग करण्याची दृष्टी होती. सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती यांचा उपयोग त्यांनी लोकजागृतीसाठी केला. त्या काळात जनतेशी संपर्क साधण्यासाठी सांस्कृतिक परंपरा प्रभावी माध्यमे होती, हे त्यांनी ओळखले.पाचवे



म्हणजे त्यांचे नेतृत्व व्यक्तिगत नव्हते. त्यांनी स्वतःपुरता संघर्ष केला नाही; तर आपल्या कुटुंबाला, मित्रांना आणि तरुण पिढीला राष्ट्रीय चळवळीत सहभागी केले. त्यामुळे त्यांच्या निधनानंतरही त्यांचे कार्य पुढे चालू राहिले.

गोविंदराव याळगी यांचे निधन १९२३ मध्ये झाले. त्यांना बेळगावात काँग्रेसचे अधिवेशन भरवण्याची इच्छा होती; परंतु १९२४च्या अधिवेशनापूर्वीच ते काळाच्या पडद्याआड गेले. त्यामुळे त्यांच्या आयुष्यभराच्या प्रयत्नांची परिणती ते स्वतः पाहू शकले नाहीत.मात्र त्यांच्या कार्यामुळे तयार झालेल्या राष्ट्रीय वातावरणाचा परिणाम १९२४च्या अधिवेशनावर झाला. महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या अधिवेशनाने बेळगावला भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात विशेष स्थान दिले. गांधीजींनी गोविंदरावांना श्रद्धांजली अर्पण केली, ही त्यांच्या कार्याची मोठी दखल होती.इतिहासात अनेकदा मोठ्या अधिवेशनांच्या अध्यक्षांची, ठरावांची आणि राजकीय परिणामांची नोंद केली जाते; परंतु त्या अधिवेशनासाठी वातावरण तयार करणाऱ्या स्थानिक कार्यकर्त्यांचा उल्लेख कमी होतो. गोविंदराव याळगींचे महत्त्व याच ठिकाणी अधोरेखित होते. त्यांनी बेळगावला राष्ट्रीय राजकारणाशी जोडणारे सामाजिक आणि संघटनात्मक काम केले.



गोविंदराव याळगी यांचे स्वातंत्र्यलढ्याच्या राष्ट्रीय इतिहासातील प्रादेशिक इतिहासाच्या दृष्टीने योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीय स्वातंत्र्यचळवळ ही केवळ दिल्ली, मुंबई, पुणे, कोलकाता किंवा लाहोरसारख्या मोठ्या केंद्रांत घडलेली घटना नव्हती. देशभरातील शहरांमध्ये, गावांमध्ये, कुटुंबांमध्ये आणि स्थानिक संघटनांमध्ये असंख्य कार्यकर्त्यांनी तिची पायाभरणी केली.बेळगावातील गोविंदराव याळगी हे अशाच स्थानिक पण प्रभावी नेतृत्वाचे प्रतिनिधी होते. त्यांनी राष्ट्रीय विचारांना स्थानिक संस्कृतीशी जोडले. त्यांनी तरुणांना संघटित केले. त्यांनी टिळकांच्या विचारांना जनसामान्यांपर्यंत पोहोचवले. त्यांनी क्रांतिकारक आणि अहिंसक अशा दोन्ही प्रवाहांशी संवाद ठेवला. त्यांनी आपल्या घराला राजकीय कार्यकर्त्यांसाठी खुले ठेवले. त्यांनी कुटुंबाला स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून त्यागाची परंपरा निर्माण केली.गोविंदराव याळगी यांचे स्मरण हे केवळ एका स्वातंत्र्यसैनिकाचे स्मरण नाही. ते बेळगावच्या राष्ट्रवादी इतिहासाचे, टिळकांच्या जनजागृतीच्या परंपरेचे आणि एका संपूर्ण कुटुंबाने स्वातंत्र्यासाठी केलेल्या त्यागाचे स्मरण आहे.

पुढच्या पीढीचा विकास समाज, शिक्षकांच्या हाती ?


ज्योतिर्मय साहित्य

प्रत्येक शिक्षकाला आपल्या विद्यार्थ्यांचे जीवन सकारात्मक आणि विकसनशील करण्या चे ध्येय असले पाहिजे. असे शिक्षण महर्षि श्री वि.वि चिपळूणकर यांची अंतरीक इच्छा होती आणि त्यांनी ती अनेक ठिकाणी व्यक्त केली होती . विद्यार्थ्या ना जीवनातील आदर्श मूल्ये बालवयातच जपण्याचे शिक्षण मिळाल्याने त्यांच्या वैचारिक विकासात सकारात्मक बदल होतच असतो. शिक्षकांनी सांगितलेले जीवन मूल्ये प्रत्यक्षात कृतीमध्ये उतरवून तो विद्यार्थी आपल्या पुढील आयुष्यात प्रगति ची शिखरे गाढण्याचा प्रयत्न करू शकतो. प्रयत्नाने यश शिखर गाठू पण शकतो. ह्या यश प्राप्ती बद्दल तो विद्यार्थी कृतज्ञतेने शिक्षका बद्दल अभिमान बाळगत असतो. कारण शिक्षकाच्या हितचिंतक मार्गदर्शनामुळे त्याच्या जीवनात सत्याचा, चांगल्या संस्काराचा श्रीगणेशा झालेला असतो.



प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या शिक्षका बद्दल एक वेगळाच विश्वास, आणि आदर असतोच. कारण त्यांच्या विचारात आई, वडील, आजी, आजोबा, बरोबरच शिक्षक हा त्यांच्या आयुष्यात आनंदी क्षण येण्या साठी चा निर्माता शिल्पकार असतो. उत्तम संस्कार त्यांच्या मुळेच होत असतात. सद्विचार, सद्भावना, सुसंगती, प्रामाणिकपणा, दया, क्षमा, शांति वृत्ती, ह्याचे बिजांकुर त्यांच्या सहवासामुळे च झालेले असते. त्यानी त्यांना केवळ विषय ज्ञान दिलेले नसते तर कला कौशल्या धीष्टीत व्यवहारीक सुख दु:खाच्या प्रसंगाची ओळख करून दिलेली असते.

(क्रमशः)



अस्वस्थ बळीराजाची आर्त हाक

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

नुकसानीचे पंचनामे करण्याच्या पद्धती, गुंतागुंतीचे निकष आणि कंपन्यांची टोलवाटोलवी यामुळे शेतकरी पुरता खचून जातो. अनेकदा तर जाचक अटींमुळे प्रत्यक्ष शेतात १०० टक्के नुकसान होऊनही कागदावर मात्र शेतकरी विम्याच्या हक्काच्या रकमेपासून वंचित राहतो. विम्याचा हप्ता भरताना बँक खात्यातून पैसे तात्काळ कापले जातात, पण जेव्हा विम्याची रक्कम मिळण्याची वेळ येते, तेव्हा शेतकऱ्याला विमा कंपन्यांच्या कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. ऑनलाईन तक्रार नोंदवण्यातील अडचणी आणि तांत्रिक घोळामुळे हजारो शेतकरी मदतीपासून दूर राहतात. नैसर्गिक आपत्तीने आधीच कंबरडे मोडलेले असताना, विम्याच्या पैशांसाठी करावी लागणारी ही लाचारी शेतकऱ्याला आत्मक्लेश देणारी ठरते.

या सर्व संकटांवर मात करून जेव्हा शेतकऱ्याचा माल कसातरी घरात येतो, तेव्हा खरी लढाई बाजारभावाची सुरू होते. वर्षभर रक्ताचे पाणी करून पिकवलेल्या मालाला बाजारात योग्य किंमत मिळत नाही.

मागणी आणि पुरवठ्याचे गणित असे काही फिरवले जाते की, शेतीमाल बाजारात



येताच भाव अचानक गडगडतात. दलालांची आणि व्यापाऱ्यांची साखळी शेतकऱ्याचे शोषण करते, ज्यामुळे ग्राहकाला महाग मिळणारी वस्तू शेतकऱ्याकडून कवडीमोल भावाने खरेदी केली जाते. नफा मात्र व्यापारी मंडळीच कमावतात. पिकाला रास्त भाव किंवा किमान आधारभूत किंमत न मिळाल्यामुळे शेतकरी सातत्याने तोट्यात राहतो. या आर्थिक कोंडीसोबतच शेतकऱ्याला आज सामाजिक पातळीवरही उपेक्षेला सामोरे जावे लागत आहे. शासकीय कार्यालयात किंवा बँकेत काम घेऊन गेल्यावर त्याला सन्मानाची वागणूक मिळत नाही. निवडणुका आल्या की घोषणांचा पाऊस पडतो, पण निवडणुका संपल्या की आश्वासनांची पूर्तता होत नाही. ही सततची आर्थिक ओढाताण, पीक विम्यातील फसवणूक, डोक्यावर साचत जाणारा कर्जाचा डोंगर आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांमुळे शेतकरी मानसिकदृष्ट्या पूर्णपणे खचून जातो.



जेव्हा त्याला सन्मानाने जगण्याचा कोणताही मार्ग दिसत नाही, तेव्हा तो हतबल होऊन आत्महत्या करतो.

बळीराजाची ही अस्वस्थता दूर करायची असेल, तर केवळ तात्पुरत्या घोषणांची मलमपट्टी नको, तर मूळ समस्येवर थेट उपाय करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य आणि शाश्वत हमीभाव मिळालाच पाहिजे. खते आणि बियाण्यांमधील काळाबाजार रोखण्यासाठी कडक कायदे करून दोषींना तात्काळ शिक्षा झाली पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पीक विम्याची प्रक्रिया संपूर्णपणे पारदर्शक आणि सुटसुटीत करून, कोणतीही दिरंगाई न करता विम्याची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात वेळेवर जमा झाली पाहिजे. विमा कंपन्यांच्या नफेखोरीला चाप लावून त्यांना शेतकऱ्यांप्रती उत्तरदायी बनवले पाहिजे. बँकिंग व्यवस्थेत सुधारणा करून नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना तात्काळ प्रोत्साहनपर लाभ देणे गरजेचे आहे, जेणेकरून प्रामाणिकपणाची कदर होईल. शेतकरी हा केवळ एक मतदार किंवा केवळ अन्न पिकवणारे यंत्र नाही तर तो या देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. जोपर्यंत आपण त्याला वेळेवर सोयी-सवलती, हक्काचा बाजारभाव आणि समाजात सन्मानाचे जीवन देत नाही, तोपर्यंत ही अस्वस्थता संपणार नाही. बळीराजाला आत्महत्येपासून रोखायचे असेल, तर संपूर्ण समाजाने आणि सरकारने त्याच्या पाठीशी केवळ आश्वासने देऊन नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून खंबीरपणे उभे राहणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559